# भुपाळी
## (गणपतीपुळे येथे म्हटली जाणारी)

पहाट झाली वाजु लागला मंजुळ हा चौघडा।।मोरया।।

उठा उठा हो उठा मोरया नेत्रांते उघडा।।ध्रु०।।

उठावयाची वेळ सुचविता आरवुनी कोंबडा ।।मोरया।।

संमार्जन करुनी घालु लागल्या द्वारी युवती सडा।।१।।

अंधारही हा पहा भीतिने मारु लागला दडा ।।मोरया।।

होईल म्हणतो मनी भानुचा अंमल सुरु करडा ।।२।।

द्वारी टाकिला असे सुगंधी सुंदर चंदन सडा।।मोरया।।

शुद्ध जलाने नाभितीर्थिचा भरुनि आणिला घडा।।३।।

नैवेद्याला मोदक, लाडू, लोणी, साखर-खडा ।।मोरया।।

सर्व सिद्धताकरुनि पूजना द्वारि राहिलो खडा।।४।।

निराकार परि ॐकाराकृति काढुनि मग शुंडा।।मोरया।।

करोनि पूजा करिन प्रार्थना दुर्मति मम खंडा।।५।।

कार्यनाशकर विघ्ने गांजिति दूर तयां दवडा।।मोरया।।

नष्ट करो हो फोडुन टाकुनि सत्वर दुरित-घडा।।६।।

"पुळ्यात" कितितरि भक्त तारिले मीच काय वावडा ।।मोरया।।

"दीनदयाघन" ब्रीद व्यर्थ हे अपुले नच दवडा ।।७।।